**महाराष्ट्र राज्य गोरबंजारा साहित्य अकादमीच्या समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र.२६२/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०२४

**वाचा :-** १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२३/ प्र.क्र.११९/सां.का.४, दिनांक १६ मार्च, २०२४
२.सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र.मराहिंसिंगुसाअ/आस्था/१४५९-१४६०/२०२४, दिनांक १६ सप्टेंबर, २०२४

**<u>प्रस्तावना -:</u>**

गोरबंजारा भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणावर व्हावा, तसेच साहित्यिक / भाषिक आदान - प्रदानातून राज्याचा सांस्कृतिक विकास साधून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावी या हेतूने महाराष्ट्र राज्य गोर बंजारा साहित्य अकादमी यांची स्थापना उपर्निर्दिष्ट १ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. आता, सदर अकादमीकरीता समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

महाराष्ट्र राज्य गोरबंजारा साहित्य अकादमीकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**अ. शासकीय सदस्य**

| | |
|---|---|
| मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | - पदसिध्द अध्यक्ष |
| मा. अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य | - पदसिध्द सदस्य |
| मा. उप सचिव, सांस्कृतिक कार्य | - पदसिध्द सदस्य |
| संचालक / सहसंचालक | - पदसिध्द सदस्य सचिव |

**ब. अशासकीय सदस्य - एकूण (११)**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. फुलसिंग कनिराम जाधव | कार्याध्यक्ष |
| २ | श्री. सुरेश मंगुजी राठोड | अशासकीय सदस्य |
| ३ | डॉ. जगदीश बाबुराव सकवान | अशासकीय सदस्य |
| ४ | प्रा. डॉ. निशा हरिलाल पवार | अशासकीय सदस्य |
| ५ | सौ. विजया श्रीराम पवार | अशासकीय सदस्य |
| ६ | श्री. मोतीराम रूपसिंह राठोड | अशासकीय सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्रा.संजय चव्हाण | अशासकीय सदस्य |
| ८ | प्राचार्य अरूण सुखदेव पवार | अशासकीय सदस्य |
| ९ | प्रा. डॉ. विनायक हब्बु पवार | अशासकीय सदस्य |
| १० | श्री.भिमराव राठोड | अशासकीय सदस्य |
| ११ | डॉ. वि. रा. राठोड | अशासकीय सदस्य |

२. **समितीचा कालावधी :-** अकादमीतील अशासकीय सदस्यांचा कार्यकाळ हा समिती गठीत झाल्यापासून ३ वर्षे किंवा समितीची पुर्नरचना होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहिल. अशासकीय सदस्यांची नियुक्ती संपुष्टात आल्यास, उक्त "परि.-अ" मधील संरचनेतील शासकीय सदस्यांतर्गत महाराष्ट्र राज्य गोर बंजारा साहित्य अकादमीचे कामकाज पुढे चालु राहील.

३. **अशासकीय सदस्यांना भत्ता :-** या समितीच्या सर्व अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या प्रचलित शासन निर्णयांनुसार प्रवास भत्ता व बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

४. अकादमीच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याची जबाबदारी अकादमी कार्यालयाची असेल. या कार्यक्रमासाठी अकादमीचे कार्याध्यक्ष व सदस्यांच्या मार्गदर्शनानुसार व सहकार्याने अकादमीचे अधिकारी शासकीय नियम व विहित कार्यपध्दतीनुसार कार्यक्रमाचे आयोजन करणे व यासाठी होणाऱ्या निधीचा खर्च करणे यास जबाबदार राहतील.

५. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४१००४१९२९१९१४२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( गोपिचंद पांडुरंग चव्हाण )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
४. सहसंचालक, महाराष्ट्र राज्य गोरबंजारा साहित्य अकादमी, मुंबई
५. निवड समितीचे सर्व अशासकीय सदस्य (सहसंचालक, महाराष्ट्र राज्य गोरबंजारा साहित्य अकादमी यांचे मार्फत)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा ) - २, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - २, महाराष्ट्र, नागपूर
१३. कक्ष अधिकारी (अर्थसं.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१४. निवड नस्ती, सां.का.४